
# ‘माढ्याचा राजा’

## ही मोदींची साद उमेदवारीपर्यंत पोचण्याला विश्वास देणारी

परमेश्वराचा आशीर्वाद आणि नशिबी आलेले अहोभाग्य हे खासदार नाईक-निंबाळकरांसाठी तसं खूप महत्त्वाचं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे भेटण्यासाठी अक्षरश:: काही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह बड्या नेत्यांना रांगेत थांबावं लागतं. वेटिंग करावं लागतं. मात्र, श्री मोदी यांना भेटण्यासाठी नाईक-निंबाळकरांना कधीही वेटिंग करावं लागलं नाही. रांगेत थांबावं लागलं नाही. मागच्या साडेचार वर्षाच्या काळात मोदींना भेटण्याचा ५० ते ६० वेळा योग आला. प्रत्येक वेळी ‘माढ्याचा राजा’ म्हणून हस्तांदोलन करत मोदी यांनी हसमुख चेहऱ्याने स्वागत केलं. एवढचं काय तर ‘विकास कामांचं अजून काय राहिले का’ याची आपुलकीने चौकशी केली. ‘माढ्याचा राजा अन् अजून काही विकासाचं राहिले का’ ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची साद आपल्याला दुसऱ्यांदा खासदारकीची उमेदवारी मिळवून देणारी, जनतेची सेवा करायला संधी देणारी आपुलकीची आणि तितकीच विश्वासाची नाईक-निंबाळकर यांना वाटत राहिली. देशाचं बलाढ्य नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अगदी सहजतेने भेटणं आणि त्यांनी माढ्याचा राजा असा उल्लेख करत कामासाठी दिलेली ऊर्जा घेऊनच मतदारसंघात परतत होतो. दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करून माढा मतदारसंघातील रस्ते, वीज, पाणी या मूलभूत गरजांसह तरुणाईच्या हाताला काम मिळण्यासाठी औद्योगिक वसाहती उभ्या करणे, नव्या धरणाची निर्मिती करणे असं काम होत गेलं. याची ऊर्जा देशाचे ‘नरेंद्र’ आणि महाराष्ट्राचे ‘देवेंद्र’ यांच्याकडूनच मिळत गेली. शिवाय इतरांच्यामध्ये सहकार्य झालं ते गृहमंत्री अमित शहा भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नड्डा महाराष्ट्र भाजपाचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्रिमंडळातील सर्व मंत्रीगण, प्रशासनातील सर्व वरिष्ठ अधिकारी मतदार संघातील सर्व आमदार, सर्व पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते आणि सामान्य मतदार यामुळेच दुसऱ्यांदा उमेदवारी मिळण्याचा अटकेपारच झेंडा मी लावू शकलो याचा गर्व, अहंकार नाही, मात्र अभिमान आहे, असे नाईक-निंबाळकर सांगतात. माढा मतदारसंघातील मार्गी लावलेले विविध प्रकल्प पूर्णत्वास नेहणे आणि नव्याने प्रकल्प मार्गी लावणे यासाठी भाजपामधील सर्वच श्रेष्ठींनी पुन्हा उमेदवारी देऊन जो विश्वास दाखवला, तो सार्थ केल्याशिवाय राहा राहणार नाही, आपल्या कार्यकर्त्यांना खासदार नाईक निंबाळकर सांगतात.








# बाजीगर Return

## ‘आपल्या हक्काचा खासदार’

### सर्वांनाच आपुलकी अन् जिव्हाळा

उमेदवारीचा जेव्हा विषय निघतो, तेव्हा विकास कामे हा तर मुद्दा ‘कळी’चा असतोच, पण आपल्या हक्काचा खासदार म्हणून जेव्हा नाईक-निंबाळकर यांचे नाव चर्चेत येत होतं. त्यावेळी सर्वपक्षीय नेते, पुढारी, आमदार ,पदाधिकारी छोटे-मोठे कार्यकर्ते या सगळ्यांना भेटणं, त्यांच्याशी संवाद साधनं, त्यांना आश्वासक शब्द देणे.. कामातला तडफदारपणा, तरुणाई मधील वेगळी क्रेज हे सगळं सगळं खासदार नाईक-निंबाळकर यांच्या बाबतीत दिसलं. म्हणूनच आपल्या हक्काचा खासदार म्हणून त्यांचे सर्वांच्याच हृदयात स्थान आहे.

## ‘या’साठी दुसऱ्या टर्मच्या उमेदवारीला समर्थन

केंद्र आणि राज्य सरकारच्या साधारण दीड लाख कोटींच्या निधीतून माढा लोकसभेचा चौफेर विकास साधताना जलसिंचन योजना, रस्ते पूल, रेल्वे प्रकल्प, दवाखाने, आरटीओ कार्यालय असे अनेक विकासाचे प्रश्न नाईक-निंबाळकर यांनी मार्गी लावले. जलसिंचनाच्या अनेक योजना मंजूर करून आणल्या. या प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी या मतदारसंघातील नागरिकांना खा.नाईक- निंबाळकर हेच मंजूर करून आणलेले प्रकल्प मार्गी लावू शकतात. शिवाय नव्याने प्रकल्पांना मंजुरी आणून ते प्रकल्प मार्गी लावण्याची धमक त्यांच्याकडेच असल्याने आपल्या खासदारकीच्या दुसऱ्या टर्ममध्ये तेच या प्रकल्पांना न्याय देऊ शकतात असा विश्वास मतदार संघातील लोकांना वाटला त्याचा सर्वेक्षण अहवाल श्रेष्ठींकडे गेला आणि या अहवालावरूनच म्हणजेच प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी खा.नाईक-निंबाळकर हेच हवेत असा निर्णय त्यांना उमेदवारी देताना झाला.

सोलापूर : बहुचर्चित माढा लोकसभेची भाजपाची उमेदवारी जाहीर झाली. अपेक्षितपणे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनाच पक्षानं दुसऱ्यांदा उमेदवारी बहाल केली. वास्तविकपणे उमेदवारीचा संघर्ष तसा तीव्र होत गेला होता. अकलूजकर मोहिते-पाटील हे भाजपा पक्षाकडूनच्या उमदेवारीसाठी खूपच आग्रही होते. त्यांच्या समर्थकांनी उमदेवारीसाठी प्रचंड रान पेटविले होते. नाईक-निंबाळकर यांना उमेदवारी देण्यात देवेंद्र फडणवीस यांची भूमिका अत्यंत मोलाची ठरली. या मतदार संघाच्या उमेदवारीची चर्चा गल्लीपासून ते दिल्लीपर्यंतच नव्हे तरी विमानातदेखील झाली. उमेदवारी नेमकी कोणाला मिळणार? यावर नाईक-निंबाळकर आणि मोहिते-पाटील यांच्या खास समर्थकांमध्ये हजारोंच्या पैजाही लागल्या होत्या. पण, उमेदवारीत मोहिते-पाटलांना झिडकारून फलटणकर नाईक-निंबाळकरांच्या उमदेवारीवर भाजपानं अखेर शिक्कामोर्तब केलं. पहिल्याच टर्ममध्ये विकास काय असतो? खासदार कशा पद्धतीने विकास करु शकतो, हे रिपोर्ट कार्डमधून दाखवून देत देशातील खासदारांमध्ये टॉपटेनच्या यादीत आलेल्या श्री नाईक-निंबाळकर यांनी जणू अटकेपार झेंडा लावला. माढ्याच्या मतदार संघात विकासाचा आणि आमदारांचा हुकमी एक्का ठरलेले नाईक-निंबाळकर बाजीगर ठरले. त्यांच्याबाबतीत ‘बाजीगर रिटर्न’ हे शब्द वर्णनासाठी समर्पक ठरतात.




दरम्यान, उमेदवारीत बाजीगर ठरताना त्यांच्या नशिबाने अनेक गोष्टी त्यांच्या पथ्यावर पडल्या तर अनेक बाबी त्यांनी खास डाव टाकून आपल्या पथ्यावर पाडूनही घेतल्या. खासदार नाईक-निंबाळकरांना दुसऱ्या टर्मसाठी उमेदवारी मिळणं हे तसं सोपं नव्हतं. मतदार संघातील सव्वा लाख कोटींच्या निधीतून विकास कामांचा रचलेला डोंगर, दिल्ली दरबारी वरिष्ठांपर्यंत कर्तृत्वाची उमटलेली मोहर, प्रदेश भाजपामध्ये मिळविलेला विश्वास, स्व:कीय आणि परकीय यांची बांधलेली मोळी, मोहिते-पाटील आणि रामराजे नाईक-निंबाळकर यांचा उमेदवारीला अंतर्गत विरोध होणार हे ओळखून मागच्या दीड-दोन वर्षापासून विधानसभेच्या सहाही मतदार संघात टाकलेले डाव, शत्रूपक्षाला आपलसं करण्यात मिळविलेलं यश, खास करून पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, गृहमंत्री अमित शहा आदींचे जिंकलेलं मन, मतदार संघामधील अवघ्या तरुणाईमध्ये मिळविलेली लोकप्रियतेची क्रेझ, मनमोकळा स्वभाव, निगर्वी व्यक्तिमत्त्व, दाखविलेला प्रचंड संयम आदी सगळ्या गोष्टी जणू जमून आल्या. गोळा बेरजेचे राजकारण यशस्वी झालं आणि नाईक-निंबाळकरांच्या भाजपा उमेदवारीची नौका पैलतीरी पोचली.

## ग्राउंड रिपोर्ट वगैरे... सगळंच कसं ओकेमंदी..!

२०२४ ला लोकसभेची उमेदवारी देताना भाजपाने ग्राउंड रिपोर्टला सगळ्यात महत्त्व दिले. पक्ष, संघ आणि खास करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या टीमनं माढा मतदारसंघातील फलटण, माण- खटाव, सांगोला, माढा आणि करमाळा या विधानसभेच्या प्रत्येक मतदार संघात ग्राउंड रिपोर्टच्या पार्श्वभूमीवर, सविस्तर सर्वेक्षण केले. खासदारांचे रिपोर्ट कार्ड पाहिले. या मतदार संघात खासदार नाईक-निंबाळकर यांनी कोणती विकास कामे केली का? खासदार नाईक-निंबाळकर भेटतात का? खासदार नाईक-निंबाळकर हे या मतदार संघाचे सेकंड इनिंगचे सक्षम उमेदवार ठरतात का, या प्रश्नांवर आधारित सर्वे क्षण करण्यात आलं. यामध्ये प्रत्येक आघाडीवर खासदार नाईक-निंबाळकर टॉपर मेरीटवर राहिल्याचे चित्र सर्व्हेक्षणातून पुढे आले. सर्वच आघाड्यांवर केलेल्या सर्वेक्षणात अर्थात ग्राउंड रिपोर्टमध्ये ‘नाईक- निंबाळकर ओके’ असाच शेरा मारला गेला. ज्या शेऱ्यामुळे त्यांच्या दुसऱ्या इनिंगच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाले.

## मन की बात... पण ठासूनच...



भाजपाने लोकसभेला उमेदवारी देताना अत्यंत सस्पेन्स ठेवला आहे. महाराष्ट्रासह देशात कोणत्याच विद्यमान खासदाराला पुन्हा एकदा उमेदवारी दिली जाईल, हे घोषित केलं नव्हतं. मात्र, खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर हे याला अपवाद ठरले. त्यांचे एकूणच रिपोर्ट कार्ड पाहता भाजपाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी फलटण, माढा याशिवाय अन्य अशा चार ठिकाणी रणजितसिंह नाईक-निंबाळकर हेच दुसऱ्यांदा लोकसभेचे उमेदवार असतील आणि तेच खासदार असतील असं जाहीररित्या सांगितलं होतं. खरं तेव्हांच ते उमेदवारीत बाजीगर ठरले होते.

### सांगोल्याच्या विकासाला हवीच होती दुसरी इनिंग...

माजी खासदार संदिपान थोरात, रामदास आठवले, शरद पवार, विजयसिंह मोहिते-पाटील, या सगळ्या खासदारांचं काम आपण पाहिलं. मात्र, तुलनेत खासदार नाईक निंबाळकर यांचं काम अन्य खासदारांच्या तुलनेत प्रचंड मोठं आहे.सांगोला, माढा, फलटण, माळशिरस अशा कोणत्या तालुक्यात पाणीपुरवठ्याची योजना योजना मंजुरीविना त्यांनी ठेवली नाही. पंढरपूर हे भक्तीपीठ आहे. दक्षिण काशी आहे. वारकऱ्यांच्या सोईच्या पार्श्वभूमीवर, लोणंद-फलटण-पंढरपूर या साधारण ११० वर्षाचा प्रलंबित प्रश्न त्यांनी मार्गी लावला. पाणी, रस्ते, पूल यासह अनेक विकास कामांचा त्यांनी डोंगर रचला. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या खासदारकीचे नेतृत्व सांगोला तालुक्याला पुन्हा मिळण्याची गरज आहे. सांगोला तालुक्यातील एमआयडीसी उभारण्याचं स्वप्न आहे. शिवाय या तालुक्यात साधारण एक हजार कोटींचा वस्त्र उद्योग आणण्याचे माझे व्हिजन आहे, हे प्रश्न मार्गी लागण्यासाठी आपल्या हक्काचा सर्वांना सोबत घेऊन जाणारा प्रामाणिक उमेदवार म्हणून खासदार नाईक निंबाळकर हे आहेत. आम्ही त्यांच्या विजयासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार आहोत, सेकंड इनिंगला नाईक-निंबाळकर हे मोठ्या मताधिक्याने निवडून येतील यात शंकाच नाही.



– **शहाजी पाटील**, आमदार, सांगोला

### ‘हरित’ माढ्यासाठी फलटणकरांची सक्षम उमेदवारी



नाईक-निंबाळकरांनी जलसिंचनाच्या योजना, रस्ते, पूल आदींसह विकासाच्या अनेक योजना मार्गी लावल्या. उजनीनंतरची जिल्ह्याची वरदायिनी कृष्णा फ्लड डायव्हर्जन योजना मंजूर करून घेतली. माढ्याच्या विकासासाठी नाईक-निंबाळकरांची उमेदवारी सक्षम आहे. त्यांच्या कर्तृत्वानं पुढच्या तीन वर्षात माढा तालुका जलमय झालेला दिसणार आहे. माढ्याचा सर्वांगीण विकास करण्याची धमक त्यांच्यामधे आहे. सक्षम खासदार निंबाळकरांना मिळालेल्या उमेदवारीचं आम्ही स्वागत करतो. मोठ्या मताधिक्याची ताकद माढ्याच्या विकासासाठी त्यांच्या पाठीशी लावणार आहोत.

– **बबनराव शिंदे**, आमदार, माढा

### राजकारण विरहित विकासाठी खमके नेतृत्व



करमाळा तालुक्यातील विकासाचे अनेक प्रश्न मार्गी लागतील हा मोठा विश्वास आहे.राजकारण विरहित विकास साधण्याची मोठी धमक असलेले हे गतिमान नेतृत्व आहे. दुसऱ्या टर्ममध्ये करमाळा तालुक्यातील केम उड्डाणपूल, पालखी मार्गावरील रेल्वे उड्डाणपूल, कुर्डूवाडी रेल्वे पूल, कुर्डूवाडी येथील रेल्वे कारखान्याचे विस्तारीकरण आदी प्रश्न ते मार्गी लावतील. करमाळा तालुक्यासाठी मंजूर करून आणलेले प्रकल्प पूर्णत्वास नेणे आणि नव्याने प्रकल्प मार्गी लावणे यासाठी दुसऱ्या इनिंगची रणजितसिंह नाईक-निंबाळकरांची खासदारकी अत्यंत उपयोगी पडणार आहे.

– **संजयमामा शिंदे**, आमदार, करमाळा

### खासदारकीच्या दुसऱ्या इनिंगचं खास स्वागतच



माण-खटाव तालुक्यात शेतीच्या पाण्याचा प्रश्न हा ‘कळी’चा मुद्दा होता. अत्यंत जिव्हाळ्याच्या शेतीच्या प्रश्नावर खासदार नाईक-निंबाळकर आणि आमदार जयकुमार गोरे यांनी काम केले. सिंचन योजनांना सुधारित प्रशासकीय मंजुरी मिळवून दिली. या योजना मार्गी लावण्यात या दोघांचा अत्यंत सिंहाचा वाटा आहे. नाईक-निंबाळकर यांनी आपल्या खासदारकीच्या पहिल्या टर्ममध्ये मुख्यत्वे जलसिंचनाच्या योजना, रस्ते, वीज यासह अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले. त्यांच्या दुसऱ्या खासदारकीच्या उमेदवारीचं विशेष स्वागत आम्ही करतो.

– **दिलीप येळेगावकर**, माजी आमदार, माण खटाव

### गतिमान विकासाच्या नेतृत्वाला संधी



लोकसभेचा खासदार म्हणून मागच्या साडेचार वर्षातील नाईक-निंबाळकरांचे नेतृत्व अत्यंत प्रभावी ठरले. निरा-देवघर प्रकल्प, फलटण-माळशिरस कालवा, सांगोला उपसा सिंचन, लोणंद-फलटण-पंढरपूर रेल्वे मार्ग यासह अनेक जनपयोगी प्रकल्प त्यांनी मार्गी लावले. मतदार संघात रस्त्याचे जाळे निर्माण केले. नव्याने एमआयडीसी स्थापन करण्यासाठी वजन खर्ची टाकले. एकुणच त्यांचे रिपोर्ट कार्ड अत्यंत उजबे ठरले. केलेला विकास आणि पुढील पाच वर्षाच्या विकासाचे व्हिजन यावरुन त्यांना दुसऱ्या टर्मसाठी दिलेली उमेदवारी अत्यंत योग्य आणि अभिनंदनीय आहे.

– **जयकुमार गोरे**, आमदार, माण

### दिलेला शब्द पाळणाऱ्या धडाकेबाज नेतृत्वाचे स्वागतच



खासदार नाईक-निंबाळकरांच्या पाठीशी माळशिरस तालुक्यातील जनतेने तब्बल एक लाखाहून ज्यादा मताधिक्याचे पाठबळ दिले. याची उतराई त्यांनी केली. अनेक विकासाच्या योजना या तालुक्यात आणल्या फलटण-माळशिरस कालवा उभारण्याला मंजूरी घेतली. निरा-देवघर प्रकल्पात या तालुक्यातील १६ गावे समाविष्ट केली. म्हसवड एमआयडीसीत या तालुक्यातील गावांचा समावेश केला. दिलेला शब्द पाळणारं विकासप्रिय असं नाईक-निंबाळकरांचं व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या नेतृत्वाची खऱ्या अर्थाने या टर्मला गरज होती ती पक्षश्रेष्ठींनी पुर्ण केले असे म्हणता येईल.

– **राम सातपुते**, आमदार, माळशिरस

### करमाळ्याच्या भरभरून विकासाची हमी



खासदारकीच्या पहिल्या टर्ममध्ये नाईक-निंबाळकर यांनी माढा-करमाळा भागाला चांगला प्रतिसाद दिला. केंद्राकडून रेल्वेसाठी रेल्वे मोठा निधी आणून रेल्वेचे प्रश्न मार्गी लावले. करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात हरितक्रांतीची पहाट उगविण्यास कारणीभूत ठरणारा रिटेवाडी उपसा सिंचन योजनेचा महत्त्वाचा हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. हा प्रकल्प ते मार्गी लावतील याबद्दल आम्हाला विश्वास वाटतो. करमाळा-माढा मतदार संघातील महिला आणि युवकांचे प्रलंबित प्रश्न आम्ही त्यांच्याकडून नक्की सोडवून घेऊ.

– **रश्मी बागल-कोलते**, बागल गट प्रमुख, करमाळा